25-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/24/2025 11:34 PM Page 1




पोलिसांचे डोळे उघडण्यासाठी आत्महत्येचा प्रयत्न
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



इंग्लंडची ऐतिहासिक खेळी; भारताचा पराभव
पान ४ वर

वेर्णा, बुधवार, २५ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 293 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 25 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### जुलै २०२५ पासून रेल्वे प्रवास महागणार ?

**नवी दिल्ली, दि. २४ :** भारतीय रेल्वेने अनेक वर्षांनंतर रेल्वे तिकिटांच्या किमती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वे महामंडळ १ जुलै २०२५ पासून तिकिटांचे नवे दर जाहीर करणार आहे. नव्या नियमानुसार तत्काळ तिकीट काढण्यासाठी आधार प्रमाणीकरण (आधार व्हेरिफिकेशन) बंधनकारक आहे. रेल्वे मंत्रालयाने १० जून २०२५ रोजी आधार प्रमाणीकरणाबाबतचे निर्देश जारी केले आहेत. आधार प्रमाणीकरणामुळे तत्काळ तिकिटांच्या दलालीला तसेच अनधिकृत एजंटना आळा घालणे शक्य होणार आहे.

रेल्वेने रेल्वे तिकिटांच्या दरात वाढ केली आहे. रेल्वेच्या निर्णयानुसार नॉन-एसी मेल आणि एक्सप्रेस गाड्यांमध्ये आता प्रति किलोमीटर १ पैशाने वाढ होईल, तर एसी क्लासमध्ये ही वाढ २ पैशांनी होईल. या तिकीट वाढीमुळे लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या खिशाला कात्री बसण्याची शक्यता आहे .

रेल्वेने तत्काळ तिकीट बुकिंगच्या नियमांमध्येही मोठा बदल केला आहे. १ जुलै २०२५ पासून तत्काळ तिकिटे बुक करण्यासाठी आधार प्रमाणीकरण आवश्यक असेल. रेल्वे मंत्रालयाने १० जून २०२५ रोजी आदेश जारी केला आहे आणि सर्व रेल्वे विभागांना याबद्दल माहिती देण्यात आली आहे .आता तत्काळ तिकिटे फक्त इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनच्या वेबसाइट किंवा ॲपद्वारे बुक करता येतील आणि यासाठी आधार पडताळणी आवश्यक असेल.

इतकेच नाही तर १५ जुलै २०२५ पासून तत्काळ तिकिट बुकिंग दरम्यान एक अतिरिक्त पायरी जोडली जाईल ज्यामध्ये आधार पडताळणी करावी लागेल. म्हणजेच, आता तुम्हाला तिकीट बुक करण्यापूर्वी तुमच्या आधार क्रमांकाद्वारे जढ्ढ पडताळणी करावी लागेल.

तत्काळ तिकीट बुकिंगमध्ये अनधिकृत एजंट्सचा हस्तक्षेप रोखण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने कडक उपाययोजना केल्या आहेत. नवीन नियमांनुसार, रेल्वेच्या अधिकृत बुकिंग एजंट्सना पहिल्या दिवशी सुरुवातीच्या अर्ध्या तासाच्या वेळेत तत्काळ तिकिटे बुक करण्यास मनाई करण्यात आली आहे.

रेल्वेने सर्व रेल्वे विभागांना या बदलांची माहिती देण्यास सांगितले आहे. तत्काळ बुकिंग प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरळीत करणे हे या निर्णया मागील उद्देश आहे.

### इराणवर हल्ल्यासाठी अमेरिकेकडून भारतीय एअरस्पेसचा वापर? भारताने फेटाळला दावा

**नवी दिल्ली, दि. २४ :** गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या इराण आणि इस्त्रायलच्या वादात आता अमेरिकेने उडी घतली आहे. अमेरिकेने इराणच्या तीन अणु केंद्रांवर रविवारी(दि.२२) पहाटे हल्ला केला. दरम्यान, अमेरिकेच्या लढाऊ विमानांनी इराणवर हल्ले करण्यासाठी भारतीय एअरस्पेसचा वापर केल्याचा काही सोशल मीडिया हँडलने दावा केला होता. जो भारताने रविवारी खोटा असल्याचे सांगत फेटाळून लावला आहे. अमेरिकेने इंडियन एअरस्पेसचा वापर केल्याचा दावा करण्यात आला आहे. हा दावा खोटा असल्याचा सरकारकडून सांगण्यात आले आहे. एका अधिकृत निवेदनात, प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो (झखइ) च्या फॅक्ट चेक युनिटने हे दावे खोटे असल्याचे खोडून काढले आणि स्पष्ट केले की, अनेक सोशल मीडिया अकाउंट्सनी असा दावा केला आहे की अमेरिकेने ऑपरेशन 'मिडनाईट हॅमर' दरम्यान इराणविरुद्ध हल्ल्यांसाठी भारतीय एअर स्पेसचा वापर केला होता. हा दावा खोटा आहे.

पीआयबीने अमेरिकेच्या जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफचे अध्यक्ष जनरल डॅन केन यांच्या पत्रकार परिषदेचा हवाला दिला , ज्यात त्यांनी अमेरिकन विमानांनी घेतलेल्या पर्यायी मार्गांची तपशीलवार माहिती दिली आणि हे सर्व दावे निराधार असल्याचे फेटाळून लावले.

# कर्माच्या फळांचा हिशेब सुरू झाला आहे - ढवळीकर

■ टीम दैनिक हेराल्ड :

**फोंडा, दि. २४ : कोणाला मंत्रिमंडळात ठेवायचे आणि कोणाला काढायचे हा भाजपचा अंतर्गत निर्णय असतो, असे म्हणत वीजमंत्री आणि मगो नेते सुदिन ढवळीकर यांनी भाजपमध्ये सुरू असलेल्या सत्तानाट्यावर भाष्य करताना, थेट नाव न घेता माजी मंत्री गोविंद गावडे यांच्यावर सूचक टीका केली. कवळे येथे माध्यमांशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, जे आमदार लोकांशी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींशी आदराने वागत नाहीत, त्यांना त्यांच्या कर्माची फळं भोगावीच लागतात.**

गोविंद गावडे यांना मंत्रिमंडळातून वगळण्याच्या निर्णयानंतर आणि त्यानंतर खांडोळा येथे झालेल्या गावडे यांच्या भावनिक भाषणानंतर ढवळीकर यांची ही पहिली प्रतिक्रिया नोंदवली गेली. ढवळीकर यांनी जरी गावडे यांचे नाव घेतले नाही, तरी त्यांच्या प्रतिक्रियेतून कोणाला उद्देशून बोलले आहे हे स्पष्ट होते.

गावडे यांनी केलेल्या एका थेट दाव्याबाबत एका प्रश्नाला उत्तर देताना ढवळीकर यांनी उघड केले की, माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर आजारी असताना त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपदासाठी प्रस्ताव आला होता. पर्रीकरांनी सहमती दिली होती. मात्र, विजय सरदेसाई, रोहन खंवटे आणि त्या काळातील एक आमदार यांना याचा तीव्र आक्षेप होता, असे सांगत ढवळीकर यांनी पुन्हा गावडे यांचा अप्रत्यक्ष उल्लेख केला. त्या आमदाराने मला अपशब्दही वापरले होते, आणि पर्रीकरांना हे आवडले नव्हते.

पान २ ▶

### हिम्मत असेल तर गावडेना पक्षातून काढा - सरदेसाई

ज्या पद्धतीने भाजपा आमदार गोविंद गावडे यांनी त्यांच्याच पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांसहीत अन्य नेत्यांची जाहीर पोलखोल केलेली आहे , ती पाहता, पक्षशिस्तीचा टेंभा मिरवणारे भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी गावडे यांना पक्षातून काढून टाकण्याची धमक दाखवावी असे आव्हान फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी नाईक यांना दिले आहे .

### याबाबत प्रदेशाध्यक्षच बोलतील - तानावडे

मंत्रीमंडळातून तडकाफडकी काढल्यानंतर सुद्धा गोविंद गावडे यांनी ज्याप्रकारे भाजपाच्या नेत्यांची , अगदी मुख्यमंत्र्यांसहीत नूतन प्रदेशाध्यक्षांची आपल्या खांडोळा येथील भाषणात थेट खिल्ली उडवून जे गंभीर आरोप केलेले आहेत , त्याबाबत विचारले असता , भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि विद्यमान राज्यसभा सदस्य सदानंद तानावडे यांनी मौन बाळगणे पसंत केले .पक्षामधलाच एक आमदार , जो सरकारमध्येच आहे, त्याने भाजपच्या कार्यप्रणालीविषयी अगदी थेट केलेल्या आरोपांविरोधात केलेल्या वकतव्यांबद्धल भाजपचे नावानिर्वाचीत प्रदेशाध्यक्ष दामू नाईक हेच प्रतिक्रीया देतील असे सांगत तानावडे यांनी स्वत: बोलणे टाळले.




# ३० जूनपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४ :** भारतीय हवामान विभागाने (आयएमडी ) मंगळवारी गोव्यासाठी जारी केलेला यलो अलर्ट ३० जूनपर्यंत वाढवला असून राज्यात काही भागांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यापूर्वी २८ जूनपर्यंत लागू असलेला अलर्ट हवामानातील तीव्रतेमुळे दोन दिवसांनी पुढे ढकलण्यात आला आहे.

आयएमडी ने जारी केलेल्या माहितीनुसार, २४ जून रोजी सकाळी ८.३० वाजता संपलेल्या २४ तासांच्या कालावधीत धारबांदोराडा येथे सर्वाधिक २.९९ इंच पावसाची नोंद झाली. इतर प्रमुख ठिकाणांमध्ये सांगे आणि केपे येथे प्रत्येकी १.८ इंच, साखळी १.४ इंच, दाबोळी आणि काणकोण येथे १.३ इंच, जुने गोवा १.१ इंच, पणजी व मडगाव प्रत्येकी ०.९४ इंच, मुरगाव व पेडणे येथे प्रत्येकी ०.७५ इंच आणि म्हापसा येथे ०.२७ इंच पावसाची नोंद झाली.

### नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

गेल्या २४ तासांत आलेल्या जोरदार पावसामुळे आणि वाऱ्याच्या जोरामुळे राज्यात अनेक ठिकाणी झाडे कोसळून मालमत्तेचे नुकसान झाले आहे. होंडा-सत्तरी येथे एक आंब्याचे झाड कोसळून एका घराला व कारला अंशतः नुकसान झाले. आगशी परिसरात एका मोठ्या झाडाच्या पडण्याने दोन घरांचे मोठे नुकसान झाले असून अंदाजे ₹४ लाखांचे नुकसान झाल्याचे स्थानिक प्रशासनाने सांगितले. सुदैवाने, कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

ओशेल - शिवोली येथे माजी आमदार दयानंद मांद्रेकर यांच्या घरावरही झाड कोसळले असून या घटनेत काही प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले आहे. अग्निशमन व आपत्कालीन सेवांनी त्वरित घटनास्थळी धाव घेऊन एका तासाच्या आत अडथळा दूर केला, मात्र वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

गोवा-बेळगावी दरम्यानचा महत्त्वाचा दुवा असलेल्या अनमोड-हेम्मडगा मार्गावर पावसामुळे संरक्षक भिंत कोसळली. ₹१० लाख खर्चून उभारण्यात आलेली ही भिंत कोसळल्याने रस्त्याचा कडेला धोकादायक उघडपणा निर्माण झाला आहे. या आंतरराज्य मार्गावरून वाहने चालवणाऱ्या प्रवाशांना यामुळे गंभीर धोका निर्माण झाला असून संबंधित यंत्रणांकडून तातडीची खबरदारी घेण्यात येत आहे.

राज्यातील हवामान अधिकच पावसाळी होण्याची शक्यता लक्षात घेता आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि अनावश्यकपणे प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाकडून विशेषत: झाडांच्या आसपासच्या भागात किंवा पावसामुळे कमकुवत झालेल्या रस्त्यांवरून जाण्याचे टाळण्याचे सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# दोन अपघात : एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २४ :** फोंडा तालुक्यात मंगळवारी पहाटेच्या सुमारास दोन वेगवेगळ्या अपघातांच्या घटना घडल्या. केरये-खांडेपार येथे झालेल्या स्वयंअपघातात ३६ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला असून, बेतोडा येथे एका पादचाऱ्यास गंभीर दुखापत झाली आहे.

तरवळे-शिरोडा येथील नुशिष शाणू नाईक (वय ३६ ) याचा केरये-खांडेपार मार्गावर मंगळवारी पहाटे साडेचारच्या सुमारास झालेल्या दुचाकी अपघातात मृत्यू झाला.

प्राथमिक माहितीनुसार, नुशिष आपल्या जीए-०५ -आर-२४०४ क्रमांकाच्या दुचाकीवरून फोंड्याहून खांडेपारच्या दिशेने जात असताना सोमनाथ मंदिराजवळ रस्त्यावर अचानक आलेल्या भटक्या गुरांना चुकवण्याच्या प्रयत्नात त्याचा दुचाकीवरील ताबा सुटला. त्यामुळे तो रस्त्यावर फेकला गेला आणि त्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली.

त्याच वेळी त्या मार्गावरून जाणाऱ्या एका नागरिकाने अपघात पाहून पोलिसांना तत्काळ माहिती दिली. फोंडा पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत नुशिष याला फोंडा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढे गोमेकॉ इस्पितळात हलविण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. या घटनेचा तपास फोंडा पोलिस निरीक्षक विजयनाथ कवळेकर करत आहेत.

दुसऱ्या घटनेत बेतोडा येथे बोलेनो कारने धडक दिल्याने एक ६७ वर्षीय पादचारी गंभीर जखमी झाला आहे. मकबुलसाब हजरेसाब नवार, राहणार कासारवाडा, असे जखमी व्यक्तीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रत्नाकर पुजारी (वय ५८ ), हे बोलेनो कार (वाहन क्रमांक अद्याप उपलब्ध नाही) चालवत असताना फोंडाहून बेतोडा येथे जात होते. बेतोडा येथे पोहोचल्यावर त्यांनी निष्काळजीपणे आणि वेगात वाहन चालवत असताना रस्त्यावर असलेल्या नवार यांना जोरदार धडक दिली.

या धडकेत नवार हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी फोंडा पोलिसांनी आरोपी चालकावर निष्काळजी वाहन चालवण्याचा गुन्हा नोंदवला आहे.या दोन्ही घटनांमुळे फोंडा परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी वाहतूक नियंत्रण, रस्त्यावरील सुरक्षितता आणि रस्त्यावर असलेल्या भटक्या जनावरांबाबत उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# साळ नदी पुनरुज्जीवन योजनेवर स्थानिकांचा वाढता विरोध

## जमीन अधिग्रहणाच्या शक्यतेने नागरिकांची चिंता वाढली | मास्टर प्लान २०४१ मध्ये कोणतीही स्पष्टता नाही

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २४ :** साळ नदीच्या रूपांतरणासाठी प्रस्तावित इको-कॉरिडॉर' प्रकल्पावर स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांकडून तीव्र विरोध व्यक्त केला जात आहे. मडगाव २०४१ मास्टर प्लॅन' अंतर्गत सादर करण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेविषयी सरकार पुरेशी पारदर्शकता ठेवत नसल्याचा आरोप करत अनेकांनी जमीन अधिग्रहणाच्या शक्यतेबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

मुंबईस्थित स्टुडिओ पॉड' या शहरी नियोजन सल्लागार संस्थेने नुकतेच मडगाव नगरपालिकेच्या सभागृहात मास्टर प्लॅनचे सादरीकरण केले. नदीकाठ पक्का करणे, चालण्यासाठी पायवाट तयार करणे, भूदृश्य सौंदर्यीकरण करणे आणि इको-पर्यटन केंद्रे उभारणे अशी योजना मांडण्यात आली.



मात्र, सादरीकरणात प्रस्तावित कामांसाठी आवश्यक असणाऱ्या जमिनींबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही, असा आरोप स्थानिक रहिवासी मारिया फर्नांडिस यांनी केला. विहार मार्ग, उद्याने आणि इको-स्पेससाठी कोणाची जमीन घेतली जाणार ? हे अजूनही स्पष्ट नाही, असे त्यांनी विचारले.

पर्यावरण कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणले की प्रस्तावित इको-कॉरिडॉरमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या अनेक भूखंडांवर शेतकरी, मच्छीमार, तसेच झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांचे मालकी हक्क आहेत. अशा परिस्थितीत सरकारने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया पारदर्शक ठेवावी आणि कोणत्याही कारवाईपूर्वी स्थानिक जनतेची सल्लामसलत घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मडगावमधील मच्छीमार जोसेफ परेरा म्हणाले की साळ नदीत अनेक वर्षांपासून सांडपाणी वाहत आहे. हे थांबवण्यासाठी आम्ही वेळोवेळी मागण्या केल्या, न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहेत. हे प्रश्न सोडवले नाहीत, तर वरवरची सुशोभीकरणाची कामे फार उपयोगाची ठरणार नाहीत.

साळ नदी सध्या भारतातील सर्वाधिक प्रदूषित नद्यांपैकी एक मानली जाते. नदीकाठावरील व्यावसायिक भागातून मोठ्या प्रमाणावर सांडपाणी निघत असल्याने नदी गाळयुक्त आणि प्रदूषित झाली आहे. ज्या ठिकाणी जलवाहतूक कधी प्रभावी होती, तिथे आता सौम्य प्रवाह उरला आहे, असे खुद्द सल्लागार अहवालात नमूद करण्यात आले आहे.

काही कार्यकर्त्यांनी असा संशय व्यक्त केला आहे की, हा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प नसून नदीकाठच्या मौल्यवान जमिनींवर डोळा ठेवलेली गुप्त अधिग्रहण योजना' असू शकते. स्वच्छ झालेल्या परिसरात नंतर भूविकास प्रकल्पांची शक्यता प्रबळ आहे, असे ते म्हणाले.

या प्रकल्पात कोणती जमीन, कोणत्या आधारावर आणि कोणत्या पद्धतीने घेतली जाणार, याचे कोणतेही स्पष्ट धोरण सादर करण्यात आलेले नाही. काही भागांत नारळबागा आहेत, तर काही ठिकाणी अनौपचारिक वस्त्या. त्यामुळे कोणतीही अधिग्रहण प्रक्रिया केवळ गुंतागुंतीचीच नव्हे तर विवादास्पद ठरू शकते.

स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांनी सल्लागार आणि सरकारकडे एकमुखाने मागणी केली आहे की, कोणतीही अधिग्रहण प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी जनतेशी स्पष्ट आणि खुले संवाद साधावा. प्रदूषण नियंत्रणाच्या समस्यांचे निराकरण, नुकसानभरपाईचा विचार आणि शाश्वत व्यवस्थापनाची हमी दिली जावी.

साळ नदी पुनरुज्जीवन योजना ही केवळ एक मेकओव्हर' योजना न राहता, स्थानिकांचे हक्क, पर्यावरणीय शाश्वतता आणि पारदर्शक नियोजन या सर्व बाबींशी संबंधित आहे. सरकार आणि सल्लागारांनी या बाबतीत अधिक खुलेपणाने आणि जबाबदारीने संवाद साधणे, हीच आता काळाची गरज आहे.